# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती यांचे कार्यालय

**कॅम्प, अमरावती - 444 602**

कार्यालयीन दूरध्वनी 2662090 / 2662593. 2662680 (वैयक्तिक), फॅक्स- 2663314
वनसंपर्क दुरध्वनी (निःशुल्क) 155314 (फक्त लँड लाईन वरुन संपर्कासाठी)
ई-मेल-पत्ता- ccftamravati@mahaforest.gov.in


आदेश क्रमांक 402 अमरावती-२,दिनांक 23 /०३/२०१७

संदर्भः- १) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),अमरावती यांचे आदेश क्रमांक ६५ दिनांक २४/०५/२०१५
२) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),अमरावती यांचे आदेश क्रमांक ३२८ दिनांक १८/०१/२०१७
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/१९/१६-अ, दिनांक ०५ मार्च,२००२
४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:एफटीआर १५/०४/प्र.क्र.१३६/फ-४ दिनांक १२/०७/२००४
५) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:एफटीआर १५०४/प्र.क्र.१३६/फ-४ दिनांक २७ सप्टेंबर,२००७

१.० वनरक्षक संवर्गातून वनपाल संवर्गात पदोन्नतीसाठी दिनांक २३/०२/२०१५ व दिनांक ०४/१०/२०१६ रोजीच्या बैठकीत पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीच्या आधारावर, संदर्भीय क्रमांक १ व २ येथील आदेशानुसार, खालील तक्त्यातील अनुक्रमे १ ते ४ आणि ५ वरिल वनरक्षकांना वनपाल संवर्गात अपंग कोटयाअंतर्गत पदोन्नती प्रदान करण्यात आलेली होती.

| अ.क्र. | वनरक्षकांचे नाव सर्वश्री |
|---|---|
| १ | कु.निलीमा रमेशराव उगले |
| २ | कु.सविता दशरथ दोडके |
| ३ | रितेश सुधीर उमक |
| ४ | सचिन विठोबा सदाफळे |
| ५ | निलेश रामसिंग राठोड |

२.० संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयानुसार अपंग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमधील ३ % आरक्षण हे गट-क मधून गट-क मधील पदांसाठी, गट-ड मधून गट-ड मधील पदांसाठी आणि गट-ड मधून गट-क मधील पदांसाठी अपंगाच्या नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांकरीता (Identified Posts) असेल, असे नमुद आहे. त्यानुषंगाने संदर्भ क्रमांक ४ येथील शासन निर्णयातील परिशिष्ट-अ मध्ये विहित केलेल्या पदांना ३ % अपंग आरक्षण लागू करण्यात आलेले आहे. यात वनपाल पदांचाही समावेश होता.

३.० संदर्भ क्रमांक ५ येथील शासन निर्णयानुसार वन विभागातील क्षेत्रिय कामाकाजाशी संबधीत सहाय्यक वनसंरक्षक, वनक्षेत्रपाल, वनपाल व वनरक्षक या पदांकरीता लागू करण्यात आलेले ३ % अपंग आरक्षण रद्द करुन सदरहू पदांना अपंग आरक्षणातून संपूर्ण सूट देण्यात आलेली आहे.

..२..

४.० सबब उपरोक्त कर्मचाऱ्यांच्या वनपाल संवर्गात पदोन्नतीच्या दिनांकास वनपाल हे पद **अपंगाच्या नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांमध्ये (Identified Posts)** मोडत नाही. ही बाब निदर्शनास आल्याने, अपंग कोटयाअंतर्गत वनरक्षक संवर्गातून वनपाल संवर्गात पदोन्नतीसाठी दिनांक २३/०२/२०१५ व दिनांक ०४/१०/२०१६ रोजीच्या बैठकीत पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीबाबत पुनर्विचार करण्यासाठी पदोन्नती छाननी समितीची बैठक दिनांक २२/०३/२०१७ रोजी आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत पदोन्नती छाननी समितीने संदर्भ क्रमांक ३, ४ व ५ येथील शासन निर्णयातील विनिर्दिष्ट शासकीय धोरणांचे अवलोकन करुन निष्कर्ष काढले की, उक्त धोरणांचे एकत्रित विचार करता दिनांक २३/०२/२०१५ व ०४/१०/२०१६ रोजीच्या बैठकीतील उक्त वनरक्षकांच्या संदर्भात समितीने केलेल्या शिफारशी प्रचलित शासन धोरणांचे अनुसरुन ठरत नाही. असे निष्कर्ष काढून सदर समितीने उक्त दोन्ही बैठकीत उक्त वनरक्षकांबाबतीत केलेल्या शिफारशी मागे घेतल्या आहेत.

५.० पदोन्नती समितीने दिनांक २२/०३/२०१७ रोजी घेतलेल्या उक्त निर्णयाच्या पार्श्वभूमित संदर्भ क्रमांक १ येथील आदेशातील सर्व वनरक्षक व संदर्भ क्रमांक २ येथील आदेशातील अनुक्रमांक ४३ वरिल वनरक्षकांचे वनपाल पदावरील पदोन्नतीचे आदेश रद्दबातल ठरत असून या आदेशाव्दारे उक्त परिच्छेद १.० मधील तक्त्यातील सर्व वनरक्षकांचे पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात येत आहे.

६.० सबब उक्त सर्व शासकीय सेवक हे वनरक्षक संवर्गातीलच कायम राहतील. वनरक्षक संवर्गातील त्यांचे पदस्थापनेबाबत आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहे.

७.० उक्त वनरक्षक हे त्यांचे जेष्ठतेनुसार वनपाल संवर्गात पदोन्नतीसाठी विचारक्षेत्रात येण्यासाठी पात्र राहतील.

23/03/2017

(संजीव गौड)
**मुख्य वनसंरक्षक**
**(प्रादेशिक) अमरावती**

**क्रमाक/कक्ष-८/आस्था/3565/२०१६-१७**

**अमरावती-२, दिनांक : 23/०३/२०१७**

**प्रति,**

**वरील संबंधीत वनरक्षक**
**(मार्फत : संबंधीत वनविभाग)**

**प्रतिलीपी** :- मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प , अमरावती यांना आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.

उपवनसंरक्षक, अमरावती वन विभाग, अमरावती
उपवनसंरक्षक, पूर्व मेळघाट वन विभाग, चिखलरा
उपवनसंरक्षक, बुलढाणा वनविभाग, बुलडाणा
उपवनसंरक्षक, सिपना वन्यजीव विभाग, परतवाडा
उपवनसंरक्षक, अकोट वन्यजीव विभाग, आकोट
संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा

**प्रतिलीपी** :- बिंदु नामावली (आस्थापना कक्ष ) निर्देशन विभाग, अमरावती

**प्रतिलीपी** :- ~~www.mahaforest.gov.in~~ ccftamt.gov.in या संकेतस्थळावर

**प्रतिलीपी :- आदेश फाईल**